# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक २४/०७/२०२२ (रविवार)

---

## जबरी चोरी

**पोलीस स्टेशन मौदा :–** अंतर्गत मौजा आसोली शिवार २२ किमी पश्चिम. येथे दिनांक २२/०७/२०२२ चे २१/३० वा. यातील फिर्यादी हा आपल्या मोटर सायकल क्र. एम.एच. ४० बी आर ३७४० ने नागपुर वरून ०८.३० वा.दर. घरी (झुल्लर) येण्याकरीता निघाला असता अंदाजे ०९.३० वा.दर. आसोली समोरील नाग नदी पुलीया पार केल्यानंतर पाठीमागुन एक २२० पल्सर मोटार सायकल फिर्यादीचा समोर आडवी करून थांबवुन दोन अनोळखी ईसमांनी फिर्यादीला म्हटले की “तुने मेरे गाडी को कट क्यु मारा“ असे म्हणुन फिर्यादी सोबत हुज्जत बाजी करू लागले, फिर्यादीने गाडी घेवुन जाण्याचा प्रयत्न केला असता, दोन अनोळखी ईसमांनी मोटर सायकलचा ब्रेक दाबुन फिर्यादीला खाली उतरविले व पॅटचे खिशे व बॅग चेक करू लागले. **फिर्यादीचा खिश्यामधुन नगदी ७,०००/–रू एम आय कंपनीचा मोबाईल कि. २०,०००/– रू काढुन घेतले. नंतर फिर्यादीला ढकलुन फिर्यादीची मोटर सायकल क्र एम.एच.–४०–बीआर–३७४०कि.५०,०००/–रू बळजबरीने संगनमत करून नागपुर च्या दिशेने चोरून घेवुन गेले.**

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– नितीन दिगांबर वानखेडे वय २४ वर्ष रा झुल्लर ता. कामठी जि नागपुर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे अनोळखी दोन्ही आरोपीविरूध्द कलम ३९२,३४ भादवी अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास– सहायक पोलीस निरीक्षक सतीष सोनेकर पोलीस स्टेशन, मौदा. मो. नं. ८९७५९२१७७० हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

**पोलीस स्टेशन खापरखेडा :–** अंतर्गत निजाम हॉटेल समोर खापरखेडा. येथे दिनांक २३/०७/२०२२ चे १३.३० वा दर. स्प्लेंडर मोटर सायकल क्र एम एच ४० सी डी ०९४० चा चालक गौरव शैलेशसिंह कछवाह वय ३० वर्ष रा वलनी कॉलनी याने आपले वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवुन कोराडी ते खापरखेडा रोडने येवुन निजाम हॉटेल जवळ समोरून जाणा–या कार ला ओव्हरटेक करून समोरून येणारी **पल्सर मोटर सायकल क्र एम एच ४० सी एफ ६२५१ ला ठोस मारून त्याचा चालक सुरज प्रभाकर तराडे वय २९ रा वार्ड क्र ३ खापरखेडा यास गंभींर जख्मी करून त्याचे मरणास कारणीभुत ठरला.**

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सरतर्फे पोउपनि सुर्यप्रकाश मिश्रा पो स्टे खापरखेडा यांचे रिपोर्टवरुन पो. स्टे. खापरखेडा येथे नमुद आरोपीविरूध्द कलम २७९,३३७,३०४(अ) भादवि सह कलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास– पोलीस उपनिरीक्षक जानुसिंग जाधव पो स्टे खापरखेडा हे करीत आहे.

## जबरी संभोग करणा—याविरूध्द गुन्हा नोंद.

**पोलीस स्टेशन खापा :—** अंतर्गत मौजा गौतम नगर नागपुर ३८ किमी दक्षिण. येथे आरोपी नामे— सुरज धनवटे रा वाकोडी ता सावनेर याने फिर्यादी हिला दि.१३/०५/२२ रोजी दुपारी ११/०० वा दर फोन करून झिगांबाई टाकळी नागपुर येथे बोलवले व आरोपी हा तिला त्याचे मित्राचे रूम वर घेउन गेला व दि. १३/०५/२२ ते दि .२०/०५/२२ पर्यत तिचे सोबत जबरदस्ती शारिरीक संबंध केले होते. तसेच तिला माझे विरूध्द तक्रार केली किंवा कोणाला सांगितले तर मी तुझा अश्लिल विडीओ वायरल करिल अशी तिला धमकी दिली होती. दि. २१/०७/२२ रोजी फिर्यादीने आपले पतीला तिचे सोंबत घडलेली हकिकत सांगितले तिचे प्रकृती बिघडल्याने फिर्यादी मेओ हॉस्पिटल नागपुर येथे भरती असुन तिचे बयाणा वरून आरोपी विरूध्द सदरचा गुन्हा दाखल केला असुन **सदर गुन्हयाचे घटनास्थळ हे पो स्टे जरीपटका हददीतील असुन सदर गुन्हा हा पो स्टे जरीपटका येथे वर्ग करन्यासाठी सदर वेळी पाठवन्यात आला आहे.**

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापा येथे नमुद आरोपीविरूध्द कलम ३७६(२)(एन) ५०६ भादवी अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास— मा क्षी नागेश जाधव उपविभागीय पोलीस अधिकारी काटोल मो नं ९६७३९९१९६६ हे करीत आहे.

## प्रतिबंधीत अन्नपदार्थ विक्रीसाठी जाणीवपुर्वक घेवून जाणारे आरोपी अटकेत

**पोलीस स्टेशन सावनेर :—** अंतर्गत सावनेर बायपास रोड मोहपा चौक सावनेर ४ किमी पश्चिम येथे दिनांक २३/०७/२२ चे ०१/४५ वा. ते ०३/०० वा यातील आरोपी नामे १) शकील मुकीम शेख वय ३६ वर्ष रा. वार्ड क्र २ धनगरे ले आउट ब्राम्हणी कळमेश्वर २) मधुकर नत्थुजी बदलवार वय ५३ वर्ष रा.लोणारा कळमेश्वर जि. नागपूर ३) महेन्द्र शांतीलाल चव्हाण वय ५१ वर्ष रा. वार्ड क्र ६ जुना बाजार कळमेश्वर यांनी महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेले अन्न पदार्थ खाल्यास मानवी जिवीतास अपायकारक आहेत व ते खाल्याने ते शरीरास इजा होवू शकते त्याकरीता महाराष्ट्र शासनाने त्याचे उत्पादन साठा, वितरण वाहतुक व विक्रीस प्रतिबंध लावलेला आहे, हे ज्ञात असतांना स्वताचे फायद्याकरिता या अन्नपदार्थाच्या विक्रीसाठी **एक महिन्द्रा झायलो गाडी क्र एमएच ४०, के आर ०९९० किंमत अंदाजे ४००००/रु. तसेच प्रतिबंधीत असलेले अन्न पदार्थ एकुण ५,८६,८७०/रु चा विक्रीसाठी जाणीवपुर्वक घेवून जात असतांना मिळुन आले.**

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— सर तर्फे पोहवा योगेश्वर नागोराव झोडापे पो स्टे सावनेर यांचे रिपोर्टवरुन नमुद आरोपीविरूध्द कलम ३२८,२७२,२७३,१८८, भादवी अन्न सुरक्षा आणी मानके अधि. २००६ चे विवीध कायद्यान्वयें गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयातील आरोपीतांना अटक करण्यात आली असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास— सहायक पोलीस निरीक्षक श्री नागवे पोस्टे सावनेर मो.न ९८२३४०३५५६ हे करीत आहे.

## मोटर सायकल चोरी

**पोलीस स्टेशन खापरखेडा :—** अंतर्गत खापा पाटन रोडवर लोणखैरी ०७ किमी दक्षिण. येथे दिनांक २२/०७/२०२२ चे १७/०० ते १७/३० वा दरम्यान, यातील फिर्यादीने आपले होंडा शाइन मोटर सायकल क्र—एम एच— ४० बीआर ५८८४ किमंती २०,०००/— रु ची हॅन्डल लॉक न करता रोडचा बाजुने उभी करुन ठेवली होती. सायंकाळी ०५/३० वा सुमारास परत आले असता मोटर सायकल ठेवलेल्या ठिकाणी दिसुन आली नाही. कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— आकाश सुरणदेव आतराम वय २६ वर्ष रा. लोणखैरी खड्डा खापरखेडा यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३७९ भादवी अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास— पोलीस उपनिरीक्षक मिश्रा पोस्टे खापरखेडा मो.नं— ९९२३६९४७०९ हे करीत आहे.

## गळफास लावुन आत्महत्या

**पोलीस स्टेशन सावनेर :—** अंतर्गत मौजा कवडस राहते घरी १२ किमी पूर्व, यातील मृतक नामे— मुकेश सुन्नीलाल इनवाते वय ३६ वर्ष रा. कवडस ता. सावनेर याने दिनांक २२/०७/२०२२ चे २२/०० वा. ते २३/३० वा. दरम्यान दारु पिवून दारुचे नशेत आपले राहते घरी मयालीला स्वता दुपटयाने बांधुन गळफास लावून आत्महत्या केली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— मंगेश सुन्नीलाल इनवाते वय ३३ वर्ष रा. कवडस ता. सावनेर यांचे रिपोर्टवरून पोस्टे सावनेर येथे कलम १७४ जाफौ अन्वयें मर्ग दाखल करण्यात आला. सदर मर्ग चा पुढील तपास— सफौ. संदीप नागरे ब.न ५०० पोस्टे सावनेर मो.न ९०११५९६५०० हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यु

**पोलीस स्टेशन मौदा :—** अंतर्गत मौजा गूमथळा येथे दि. २३/०७/२२ चे ७.०० वा. दर. मृतक नामे— सौ. सिमा दिपक कांडरकार वय ३१ वर्ष रा गूमथळा हीच्या छातीत अचानक जास्त दूखत असल्याने तिला शेजारच्या लोकांनी उपचाराकरीता सरकारी दवाखाना गूमथळा येथे घेवून गेले असता, असता वैद्यकीय अधिका—यानी तपासून मरण पावल्याचे सांगितले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— यूवराज भाकरु बसोकर वय ४१ वर्श रा. गूमथळा यांचे रिपोर्टवरून पोस्टे मौदा येथे कलम १७४ जाफौ अन्वयें मर्ग दाखल करण्यात आला. सदर मर्ग चा पुढील तपास— पो ना डोईफोडे मो. क्र. ९८२३३०१४७४ हे करीत आहे.

**पोलीस उपनिरीक्षक भारत थिटे**
**मो क्र ९४२२६१४६३३**
**पोलीस माहीती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण),नागपुर**